# गृहिणी

## आरोग्य

### झोप चांगली येण्यासाठी

निरोगी राहण्यासाठी, आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीमुळे लोकांना निद्रानाशाचा त्रास होत आहे. रात्री नीट न झोपल्याने शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर परिणाम होतो. याशिवाय मानसिक आरोग्यावरही परिणाम होतो. झोपण्यापूर्वी दूध पिणे खूप आरोग्यासाठी आहे. दुधात ट्रिप्टोफॅन नावाचे अमिनो ॲसिड असते. यामुळे चांगली झोप येण्यास मदत होते. रात्री झोपण्यापूर्वी काही गोष्टी मिसळून दूध प्यायल्याने झोप चांगली लागते. रात्री झोपण्यापूर्वी दालचिनी मिसळलेले दूध प्यायल्याने झोप चांगली लागते. यासाठी एक ग्लास गरम दुधात अर्धा चमचा दालचिनी पावडर मिसळून प्या. जर तुम्हाला नीट झोप येत नसेल तर रात्री झोपण्यापूर्वी हळदीचे दूध पिणे फायदेशीर ठरते. यामुळे शरीरातील थकवा आणि तणाव दूर होतो. ज्यामुळे चांगली झोप येण्यास मदत होते. याचे नियमित सेवन केल्याने निद्रानाशाची समस्या दूर होते.

## पाककला

### स्ट्रॉबेरी फ्लेवर बासुंदी

**साहित्य :** पूर्ण फॅट दूध-एक लिटर, साखर-अर्धा कप, स्ट्रॉबेरी प्युरी-अर्धा कप, वेलची पूड : १/४ टीस्पून, काजू, बदाम, पिस्ता, स्ट्रॉबेरी सजावटीसाठी, केशर-४-५ काड्या, गुलाबजल-एक टीस्पून,

**कृती :** सर्वात आधी एका भांड्यात दूध गरम करा. मध्यम आचेवर दूध उकळू द्या. दूध अर्धे होईपर्यंत उकळवा. दूध घट्ट होऊ लागले आणि त्याला क्रीमी टेक्सचर येईल. दूध घट्ट झाल्यावर त्यात साखर घाला आणि चांगले मिसळा. साखर पूर्णपणे विरघळेपर्यंत हलवत राहा. आता स्ट्रॉबेरी प्युरी हळूहळू घाला आणि मिक्स करा. यामुळे बासुंदीला गुलाबी रंग आणि स्ट्रॉबेरीचा ताजा स्वाद मिळेल. आता वेलची पूड आणि बारीक चिरलेले काजू, बदाम, पिस्ता घाला. केशर गरम दुधात भिजवून घाला आणि मिश्रणात मिसळा. गुलाबजल घालावे. आता बासुंदी तयार झाल्यावर गॅस बंद करा आणि ती खोलीच्या तापमानाला थंड होऊ द्या. नंतर ती फ्रिजमध्ये थंड होण्यासाठी ठेवा. बासुंदीला ताज्या स्ट्रॉबेरीच्या तुकड्यांनी सजवा. थंडगार स्ट्रॉबेरी बासुंदी वाट्यांमध्ये सर्व्ह करा.

## सौंदर्य

### गुबगुबीत गालांसाठी

* सुंदर, गोल व तजेलदार गाल चेहऱ्याचे सौंदर्य अधिक खुलवतात. दुधात असणारे फॅट आणि प्रथिने त्वचेला पोषण देतात. दररोज सकाळी आणि रात्री गालांवर कोमट दुधाने हलक्या हाताने ५-७ मिनिटे मसाज करा. नंतर साध्या पाण्याने धुवा.
* मेथीची पेस्ट बनवा आणि ती तुम च्या चेहऱ्यावर लावा. यामुळे तुमचा लटकलेला चेहरा घट्ट होण्यास देखील मदत होईल.

## वास्तू

माता लक्ष्मीला गुलाबाची फुले खूप आवडतात. ज्या घरात गुलाबाचे रोप लावले जाते तिथे सकारात्मक ऊर्जा नेहमीच राहते. यासाठी घरात गुलाबाचे रोप नक्कीच लावा.

## सल्ला

कारल्याची भाजी करताना त्याचा कडूपणा घालविण्यासाठी चिरलेल्या कारल्याच्या चकत्या काही वेळपर्यंत ताकात बुडवून ठेवाव्यात.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

गुरुवार, दि. ९ ऑक्टोबर २०२५

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, आश्विन कृष्णपक्ष, भरणी २०।०३, सूर्योदय ०६ वा. ३२ मि. सूर्यास्त ०५ वा. ३१ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : मनोबल व आत्मविश्वास वाढविणारी एखादी घटना घडेल. आपल्या प्रिय व्यक्तींचा सहवास लाभेल. मागील उधारी उसनवारी वसूल होईल.

**वृषभ** : व्यवसायातील आर्थिक महत्त्वाची कामे मार्गी लावू शकाल. हितशत्रुंपासून सावध रहावे. सहकाऱ्यांशी शक्यतो वाद होऊ देऊ नयेत.

**मिथुन** : मनोबल व आत्मविश्वास उत्तम राहील. जिद्द व चिकाटीने कार्यरत राहून कामे मार्गी लावू शकाल.

**कर्क** : महत्त्वाचे निर्णय घेण्याचे टाळावे. तांत्रिक वस्तू व वाहने जपून वापरावीत हलगर्जीपणा केल्यास धोका संभवतो. वडिलधाऱ्यांचा आधार मिळाल्याने अडकलेली कार्य पूर्ण होईल.

**सिंह** : वैवाहिक सौख्य लाभेल. मानसिक प्रसन्नता लाभेल. बाहेरचे जेवण शक्यतो टाळावे. आरोप-प्रत्यारोपांपासून दूर रहा.

**कन्या** : आजचा दिवस फायदेशीर ठरेल. आरोग्याकडे लक्ष द्यावे. कौटुंबिक वातावरण चांगले राहिल. आजच्या दिवसाचा उपयोग नाती-संबंधात नवीन उर्जा भरण्यासाठी करा.

**तूळ** : व्यवसायात उधारी, उसनवारीची कामे यशस्वी होणार आहेत. जुने मित्र भेटतील. मागील देणी फिटतील.

**वृश्चिक** : तुमच्या राहत्या जागेचे किंवा प्रॉपर्टीच्या जागेचे प्रश्न सोडवू शकाल. भावनात्मक स्वभावाचे असल्यामुळे आपणास नुकसान होण्याची शक्यता.

**धनु** : हाती घेतलेल्या कामात यश मिळवाल. जिद्द व चिकाटी वाढेल. वेळ आनंदपूर्वक व्यतीत होईल. महत्वपूर्ण कार्ये योग्य वेळी होतील.

**मकर** : प्रॉपर्टीची कामे मार्गी लागतील. व्यवसायातील आर्थिक गुंतवणूक फायदेशीर. मागील राहिलेले सरकारी काम पूर्ण होण्याचे योग आहेत.

**कुंभ** : रखडलेली कामे मार्गी लावू शकाल. आर्थिक लाभाचे प्रमाण समाधानकारक राहील.

**मीन** : शैक्षणिक व बौद्धिक क्षेत्रातील व्यक्तींना दिवस चांगला जाईल. वरिष्ठांकडून कौतुकाचा वर्षाव होईल.


**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# शब्दगंध क्र. ७२८० सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ | ■ | ५ | ६ |
| ७ | | | ■ | | ■ | ८ | |
| ■ | | ■ | ९ | | | | ■ |
| १० | | | | | ■ | ११ | १२ |
| १३ | | ■ | | ■ | १४ | ■ | |
| ■ | १५ | १६ | ■ | १७ | | १८ | |
| १९ | ■ | २० | | | ■ | २१ | |
| २२ | | | ■ | २३ | | ■ | |

**आडवे शब्द :-** १) मुस्लिमांची किंवा ख्रिश्चनांची स्मशानभूमी ५) कामबंद आंदोलन; हरताळ ७) सावध; हुशार; दक्ष ८) मासे पकडण्याची आकडा लावलेली काठी ९) चढविणे (ध्वज वगैरे) १०) विश्वासघातकी ११) कोणत्या प्रकारचा १३) अरबी देव १५) गुंग; मग्न; रममाण; रत १७) राजाने बोलावलेली किंवा भरविलेली सभा २०) तालुक्याचे वसुलीचे काम; महत्त्व २१) अयोध्येचा राजा; सीतापती २२) ज्ञान; जाण; धमकी; दम २३) ध्यान; शंभर हजार; लाख

शब्दगंध क्र. ७२७९ चे उत्तर



**उभे शब्द :-** १) चाचणी; परीक्षा; सत्त्व २) हनुमान; मारुती ३) मस्ती; जोर; पांघरण्याचे एक जाड व उबदार वस्त्र ४) नव्या वर्षाचा पहिला दिवस (पारशी समाजाचा) ५) मराठी कॉम्प्युटर ६) घटिकेचा साठावा भाग; क्षण ९) भरभराटलेले १०) हर; प्रत्येक; किंमत; भाव १२) गुजरातमधील एक प्रमुख नदी १४) तस्कर; चोरी करणारा १६) मुस्लिमांची प्रार्थना १७) मध्यस्थ; अडत्या १८) एक समसंख्या; एका तपातील वर्षांची संख्या १९) झुबका; गुच्छ; समूह; जुडगा

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : जुना इतिहास घोकण्यापेक्षा, नवा इतिहास निर्माण करणे गरजेचे आहे.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### छत्रीचा शोध कसा व कोणी लावला?

बाजारात रंगीबेरंगी विविध आकार आणि प्रकारच्या छत्र्या विकायला येतात. त्यांची खरेदीही फार चोखंदळपणे केली जाते. तसे पाहिले तर छत्रीचा वापर आपण केवळ पावसाळ्यात तीन चार महिनेच करतो. इतरवेळी त्या कुठे तरी अडगळीत, माळ्यावर, कोपऱ्या पडलेल्या किंवा अडकवून ठेवलेल्या असतात.

छत्री बाबतीत आश्चर्याची गोष्ट म्हणजे छत्री आज आपण पावसापासून संरक्षण करण्यासाठी वापरत असलो तरी छत्रीची निर्मिती ही उन्हांपासून संरक्षण करण्यासाठी झाली होती. Umbra म्हणजे सावली आणि इंग्रजीत छत्रीला Umbrella म्हणतात. सुर्याच्या प्रखर किरणांपासून, उन्हापासून संरक्षण करण्यासाठी छत्रीचा वापर प्रथम सुरु झाला होता.

प्राचीन इजिप्तमध्ये तेथील गुलाम आपल्या मालकाच्या डोक्यावर सावली यावी म्हणून वापरत असलेल्या आच्छादनाच्या छत्रा पासून छत्रीचा उगम झाला असल्याचे इतिहास सांगतो.

पुर्वीचे राजे महाराजे आपल्या लवाजम्यासह रथातून हत्तीवरील अंबारीतुन निघत तेव्हा त्यांचे सेवक सतत त्यांच्या डोक्यावर छत्री धरून असलेले जुन्या चित्रात दिसतात. तर राज्यांच्या राणी सरकार ऊन आणि उष्णते पासून स्वतःच्या संरक्षणासाठी छत्री वापरत. राजा आणि राणी यांच्या छत्र्या या खास बनावटीच्या असत.

पावसापासून संरक्षण करण्यासाठी छत्रीचा उपयोग प्रथम युरोप मधील फ्रान्समध्ये सतराव्या शतकात करण्यात आला. जोन्स हॅन्वे हे पर्शियन लेखक पर्यटक म्हणून लंडनला गेले होते. ते लंडनमध्ये नेहमी छत्री सोबत घेऊन फिरत. ऊन्हा बरोबरच पावसापासूनही संरक्षण करण्यासाठी छत्रीचा वापर होऊ शकतो हे त्यांनी दाखवून दिले. त्या अगोदर पुरुषांनी नेहमी छत्री सोबत बाळगणे बायकीपणाचे लक्षण मानले जाई.

चीन हे छत्रीचे माहेरघर समजले जाते. पुर्वी चीनमध्ये घरोघरी छत्र्या बनविल्या जात. बांबुच्या काट्याच्या फ्रेम बनवून त्यावर हाताने रंगवलेल्या पानेफुले, पक्षी, विविध नक्षी काढलेले कापड लावले जाई. त्यावर तेलाचा थर दिला जाई. या छत्र्या खुप सुंदर दिसत आणि खुप टिकाऊ असत पण त्या जड असत.

छत्री आवडणारा दुसरा देश म्हणजे जपान. चीन मधून युरोप आणि जपान मध्ये छत्र्यांचा प्रसार झाला. जपानमध्ये रंगीबेरंगी आणि विविध मॉडेलच्या छत्र्या वापरण्याची भारी हौस आहे. येवढेच नाही तर छत्री हा त्यांच्या राष्ट्रीयपोषाखाचा भाग बनला आहे. चीन प्रमाणेच जपानमध्ये सुध्दा पुर्वी नैसर्गिक साधनापासुन छत्र्याची निर्मिती केली जात असे. बांबूचे दांडे व झाडांच्या तुंतीपासुन कापड बनवून त्यापासून आकर्षक छत्र्या बनवल्या जात. (क्रमशः)

### अतिथी धर्म

शिवराज एका चोराचा पाठलाग करत होता. गावाच्या बोलबोळांतून पळणारा चोर अखेर शिवराजच्या नजरे आड झाला. तो चोर एका घरात घुसला होता. त्या घरातील माणसाने त्या गावच्या रिवाजाप्रमाणे अतिथी धर्म पाळला. त्या घरात घुसलेल्या चोराला आतल्या खोलीत लपविले. इतक्यात पाठलाग करणारा शिवराज तिथे आला. त्याने पळणाऱ्या चोराचे वर्णन करून 'असा मनुष्य इथे आला होता का? त्याला आपण पाहिलेत का' असे विचारले. गावच्या रिवाजाप्रमाणे अतिथी धर्म पाळण्याकरिता तो कुटुंबप्रमुख खोटे बोलला व असा माणूस पाहिला नसल्याचे सांगितले. पण, त्या गृहस्थाच्या मुलाने मात्र शिवराजकडे पाहून आतल्या खोलीकडे खून केली.

शिवराज काय ते समजला आणि त्याने आतल्या खोलीत घुसून त्या चोराला पकडले व तो त्या चोराला घेऊन गेला. त्या गृहस्थाला मुलाचा राग आला. कारण, त्याच्या मुलाने गावच्या रिवाजाप्रमाणे अतिथी धर्म पाळला नव्हता. त्या कथेपुरते त्या मुलाचे म्हणजे बरोबर होते.

तात्पर्य : सत्याचा अर्थ, महत्व परिस्थितीनुसार बदलत असते.



## जीवन का अमृत (भाग १)

**किस का दर है कि जीं आप झुकी जाती है**
**दिले खुद्दार! तेरी आन मिटी जाती है।**

– मताओ नूर,
ग़ज़ल–५३

यही विचार उन्होंने हमें दिया है कि वह कौन सी जगह है जहाँ जबीं (गर्दन, सिर) अपने आप झुकी चली जाती है और हम इंसान, जो बहुत घमंडी हैं, अहंकार से भरे हैं, हमारी आन (अहंकार) ख़ुद-ब-खुद मिटती चली जाती है। जैसे-जैसे हम सचाई के साथ जुड़ते हैं, नाम के साथ जुड़ते हैं, शब्द के साथ जुड़ते हैं, वैसे-वैसे हमारी ख़ुदी का नाश होता जाता है। आगे गुरु अर्जनदेव जी महाराज फरमा रहे हैं :

**जिस नो लाइ लए सो लागै ।**
**गिआन रतनु अंतरि तिसु जागै ।।**

### गुरू और परमात्मा

जो परमात्मा के हुक्म से, उसकी मर्जी से, उसके भाणे से नाम के साथ लगता है, वही एक पूर्ण इंसान बन सकता है। जब उसकी मर्जी हो, जब समय हो, तभी हम उसके साथ जाकर जुड़ते हैं। जब हम बाबा जयमलसिंह जी की जिंदगी की ओर ध्यान देते हैं, तो हमें मालूम होता है कि उन्होंने बहुत से दरवाजे खटखटाए और बहुत लम्बे समय के बाद उन्हें स्वामी जी महाराज के दर्शन हुए, उनकी शरण में वे पहुंचे।

जब हम हुजूर बाबा सावनसिंह जी महाराज की जिंदगी को देखते हैं, तो हमें मालूम होता है कि बाबा जयमलसिंह जी महाराज मरी की पहाड़ियों में खुद उन्हें ढूँढने के लिए गए। जब संत कृपालसिंह जी महाराज, हुजूर बाबा सावनसिंहजी महाराज की शरण में पहुँचे, तो उन्होंने सवाल किया, हजूर! इतनी देर क्यों लगा दी तो हजूर ने जवाब दिया, यही मुनासिब समय था।

यहाँ गुरु अर्जनदेव जी महाराज हमें समझा रहे हैं कि जब प्रभु का हुक्म होता है, जब उसकी मौज होती है, जब वह हम पर दयालु हो जाता है, तभी हमारा मिलाप शब्द के साथ होता है। इसीलिए दोनों हाथ जोड़कर प्रार्थना करनी है, हे प्रभु! हमें अपने मक़सद में कामयाब कर दीजिए, जिसके लिए आपने हमें दुनिया में भेजा है। जब हम ऐसी प्रार्थना करते हैं, तो सही मानो में हम अपने शरीर के लिए कुछ नहीं माँग रहे, अपनी बुद्धि के लिए कुछ नहीं माँग रहे, अपने emotions (मनोभावों) के लिए कुछ नहीं माँग रहे, लेकिन अपनी आत्मिक तरक्की के लिए प्रार्थना कर रहे हैं क्योंकि हम प्रभु से जुदाई समाप्त करना चाहते हैं।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

संसार में हरेक मनुष्य चाहता है कि मेरा जीवन सात्विक हो, मैं अच्छे कार्य करूँ, महान बनूँ और मेरे जीवन में शान्ति बनी रहे, परन्तु इच्छा होना एक बात है और उस इच्छा को साकार करने के लिए पुरुषार्थ करना दूसरी बात है। देखा गया है कि लोग चाहते कुछ है और करते कुछ और... । चाहते हैं शान्ति परन्तु परिस्थिति वश, संस्कार वश कर्म ऐसे कर बैठते हैं जिस कारण उनके अपने और दूसरों के जीवन में अशान्ति ही पैदा हो जाती है। चाहते हैं स्नेह और प्रेम लेकिन बात ऐसी कर लेते हैं जिससे गलतफहमी, मनमुटाव, संघर्ष और नफरत को बढ़ावा मिलता है। चाहते हैं कि स्वास्थ्य अच्छा हो परन्तु सात्विक अन्न की कमी के कारण शरीर में स्वास्थ्य नाशक, रोगोत्पादक तथा उत्तेजनात्मक विषैले तत्व इकट्ठे होने लगते हैं। जो न केवल शरीर के लिए हानिकारक होते हैं बल्कि मानसिक सन्तुलन को भी बिगाड़ते हैं। निर्णयशक्ति को विचलित कर देते हैं, मानसिक आवेग को अनियंत्रित, असन्तुलित, अमर्यादित या दिशा भ्रष्ट कर देते हैं इसलिए मनुष्य के आहार का उसके आचार विचार और व्यवहार से गहरा सम्बन्ध है।

### आज्ञा चक्र

प्राचीनकाल से यह कहा जाता है कि अन्न का मन पर प्रभाव पड़ता है और मन का स्वास्थ्य व रोगों से गहरा सम्बन्ध है। कहते हैं, जैसा अन्न वैसा मन, जैसा मन वैसा तन इसलिए तनावमुक्त, व्यसनमुक्त, चरित्र सम्पन्न जीवन जीने के लिए भोजन का अकथनीय महत्व है। सभी मनुष्यों का लक्ष्य यही है कि हम शान्त, शीतल और सात्विक वृत्ति को धारण कर सुखमय व आनंदित जीवन जीये और इस लक्ष्य तक पहुँचने के लिए मन को वश करना आवश्यक है। मन को वश करने के लिए हमें अन्न की परहेज पर ध्यान देना बहुत जरुरी है। ऐसे समय पर सात्विक और पौष्टिक अन्न का निर्माण करने के लिए शाश्वत यौगिक खेती पद्धति बहुत ही लाभदायक है।

भारत के प्राचीन योग के बारे में हम सब सुनते आये हैं परन्तु इस योग की अनुभूति अथवा प्राप्ति करने का समय अभी ही है। वर्तमान समय प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय के संस्थापक स्वयं सृष्टि के रचयिता बीजरूप शिव परमात्मा पिता ने अपने साकार माध्यम प्रजापिता ब्रह्मा द्वारा सहज राजयोग की शिक्षा दी है तथा उस योग द्वारा होने वाली प्राप्तियों के बारे में भी समझाया है, जिसका आज लाखों लोग लाभ ले रहे हैं। सभी का अनुभव कहता है कि सर्व समस्याओं का समाधान राजयोग ही है। योग युक्त होकर भोजन बनाने व खाने से तन और मन दोनों स्वस्थ हो जाते है।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

नातू : आजोबा तुम्ही लाईफ इन्शुरन्स का नाही काढला?
पुणेरी आजोबा : मी गेल्यावर तुम्हाला खरोखर दुःख व्हावं म्हणून!!!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* ब्रिटीश एम्पायरच्या न्यू ईयर ऑनर्स यादीमधील कमांडर ऑफ द ब्रिटीश एम्पायर हा प्रतिष्ठेचा सन्मान कोणाला मिळाला? - कोल्हापूरच्या लिना नायर

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आरोग्य सखी

एवढी खाज येते की मला सहन होत नाही. तिने सांगितलेली लक्षणे आज विचित्रच वाटत होती. माझ्या मनात शंका आली. मी तिला विचारले, तुझ्याबरोबर कोण आलं आहे? ते मला भेटत का नाहीत? त्यावर ती म्हणाली, मॅडम, तो माझा मित्र आहे. या वेळी मी तिची योनिभागाची तपासणी केली. तिथे जंतुसंसर्ग झालेला होता. तसेच बुरशीची (Fungal) लागण झाली होती. आतून 'पू'युक्त स्राव येत होता. ही सर्व लक्षणे पाहिल्यानंतर मी तिला विचारले, बाहेर बसलेला मुलगा केवळ तुझा मित्रच आहे की प्रियकर आहे? यावर ती म्हणाली, नाही मॅडम तो माझा मित्रच आहे. मी विचारले, तुझे याच्याबरोबर शारीरिक संबंध होतात का? त्यावर तिने स्तब्धपणे, निर्विकार चेहऱ्याने सांगितले, हो मॅडम, आमच्यामध्ये लैंगिक संबंध होतात. परंतु अगदी क्वचित. आठवड्यातून एकदा किंवा फार तर दोनदा. तिचे उत्तर ऐकून मी चकीतच झाले व तिला म्हणाले, अग, हे काय? तू तर म्हणालीस मित्र आहे, प्रियकर नाही. मग मित्राबरोबर असे लैंगिक संबंध ठेवतात का? तुझ्या दृष्टीनं नेमकी मित्राची व्याख्या तरी काय आहे? यामुळे उगाचच चांगल्या मित्रमैत्रिणींच्या नात्याला संशयाच्या नजरेनं बघितलं जातं.'' त्यावर ती म्हणाली, डॉक्टर, तसं काही नाही. मी काही त्याच्याशी लग्न करणार नाही. म्हणून मी त्याला प्रियकर म्हटलं नाही. तारुण्यामध्ये निर्माण होणाऱ्या कामभावनेचा आम्ही उपभोग घेतला. हळूहळू लैंगिक संबंधातून समाधान मिळाले म्हणून आमच्यामध्ये कधीतरी लैंगिक संबंध होऊ लागले. आम्ही रोजच विवाहितांसारखे असे एकत्र येत नाही. खबरदारी म्हणून मी लैंगिक संबंधांनंतर २४ तासामध्ये घ्यावयाची गर्भनिरोधक गोळी लगेचच घेऊन टाकते. त्यामुळे गर्भधारणा होत नाही. या गोळ्या वापरण्याआधी दोन वेळा गर्भधारणा झाली होती. तिचे उत्तर ऐकून संस्कार नाहीसे होऊन, 'आधुनिक' संस्कृतीचा पगडा अगदी पेहरावाबरोबरच अनैतिक लैंगिक संबंधापर्यंत पोहोचला आहे, हे जाणवले. ज्या गोष्टी विवाहानंतर होतात त्या विवाहापूर्वीच अनैतिक मार्गांनी तरुण पिढी उपभोगत आहे. त्यामुळे विवाह संस्काराचे पावित्र्य लोप पावले आहे. हा सर्व विचार मनात आल्यानंतर मी तिला जरा वरच्या स्वरात विचारले, हे सर्व सांगताना तुला काहीच वाटत नाही का? अग, विवाहित पती-पत्नी रोजच लैंगिक संबंध ठेवतात असं नाही: तर ते एकमेकांवर असलेली निष्ठा प्रेम, जिव्हाळा, सुखदुःखात साथ देणे तसेच आपल्या मुलांचा सांभाळ करून त्यांच्यावर योग्य ते संस्कार करणे यासाठीही एकत्र राहत असतात.

### आयुर्वेदीय आहार दृष्टीकोन

(क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# जय आनंद महावीर युवक मंडळाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त कार्याध्यक्षपदी सत्येन मुथा, खजिनदारपदी अमित गांधी यांची निवड

## वर्षभर विविध सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक उपक्रम राबविण्याचा निर्णय



नवीपेठ येथील जय आनंद महावीर युवक मंडळ यंदा रौप्य महोत्सवी वर्ष (२५ वर्ष) साजरे करीत आहे. यापार्श्वभूमीवर मंडळाच्या सदस्यांची बैठकीत अध्यक्षपदी शैलेश मुनोत, सेक्रेटरीपदी आनंद मुथा यांची फेरनिवड करण्यात आली.

नगर - नवीपेठ येथील जय आनंद महावीर युवक मंडळ यंदा रौप्य महोत्सवी वर्ष (२५ वर्ष) साजरे करीत आहे. यापार्श्वभूमीवर मंडळाच्या सदस्यांची बैठकीत अध्यक्षपदी शैलेश मुनोत, सेक्रेटरीपदी आनंद मुथा यांची फेरनिवड करण्यात आली. याच बैठकीत वर्षभर विविध सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक उपक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त मंडळाच्या कार्याध्यक्षपदी सत्येन मुथा यांची निवड करण्यात आली. उपाध्यक्षपदी कुंतीलाल राका व चेतन गुगळे, सह सेक्रेटरीपदी शरद मुथा व सचिन कोठारी, खजिनदारपदी अमित गांधी यांची एकमताने निवड करण्यात आली.

यावेळी ज्येष्ठ सदस्य बाबालाल गांधी, अभय लोढा, प्रकाश गांधी, ललित बनभेरू, अजित गांधी, हेमंत मुथा, सुरेश गांधी, संजय ओस्तवाल आदी उपस्थित होते.

अध्यक्ष शैलेश मुनोत म्हणाले की, मंडळाच्या सर्व सदस्यांच्या योगदानामुळे मंडळाने रौप्य महोत्सवी वाटचाल यशस्वीरित्या पूर्ण केली आहे. या वर्षी विविध आरोग्य शिबिरे, व्याख्यानमाला, विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा, जनजागृतीपर उपक्रम राबविण्याचा मानस आहे. नूतन पदाधिकारी व सर्व सदस्य एकत्रितपणे कार्यक्रमांचे नियोजन करत असून नवीन सभासदत्वासाठी इच्छुकांनी मंडळाशी संपर्क साधण्याचे आवाहन त्यांनी केले.

नूतन कार्याध्यक्ष सत्येन मुथा म्हणाले, पंचवीस वर्षांपूर्वी नवीपेठेत जय आनंद युवक मंडळ व महावीर युवक मंडळ अशी दोन मंडळे होती. एकाच परिसरातील या दोन मंडळाच्या धुरिणांनी एकीचे महत्व जाणून एकत्रित जय आनंद महावीर युवक मंडळाची स्थापना केली. तेव्हापासून मंडळ सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक अशा विविध क्षेत्रात योगदान देत आहे. वारकरी सेवा, गणेशोत्सवात मंडळाने भव्य दिव्य देखाव्यांची परंपरा जपली आहे. सर्वांचे श्रध्दास्थान आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या पुण्यस्मृतीनिमित्त दरवर्षी २८ मार्च रोजी महा अन्नदान केले जाते. हजारो भाविक याचा लाभ घेत असतात. याशिवाय विविध जनजागृतीपर उपक्रम, शिक्षक सन्मान, रक्तदान शिबिरे, नेत्रोपचार शिबिरे, समाज जागृती करणाऱ्या स्पर्धा, नगरच्या विकासाच्या दृष्टिने विचार मंथन घडविणे, समाजातील प्रेरणादायी व्यक्तीमत्त्वांचे सन्मान, विविध सामाजिक संस्थांना मदतीचा हात दिला जातो.

नूतन सह सेक्रेटरी शरद मुथा म्हणाले, रौप्य महोत्सवी वर्ष मंडळाच्या सर्व सदस्यांसाठी अभिमानास्पद आहे. या वाटचालीत सर्वच सदस्यांनी सर्वच कार्यात उत्स्फूर्तपणे योगदान दिले. रौप्य महोत्सवी वर्ष सर्व सदस्यांसाठी विशेष आहे. त्यामुळे या वर्षात संस्मरणीय उपक्रमांचे नियोजन करण्यात येत आहे. या वर्षातील विविध कार्यक्रमांनिमित्त मंडळाच्या सदस्यांनी आमची निवड करून मोठा बहुमान दिला आहे. सर्वांना सोबत घेवून या वर्षात भरीव सामाजिक कार्य केले जाईल, अशी ग्वाही मुथा यांनी दिली.

उपाध्यक्ष चेतन गुगळे यांनी आभार मानले.

# राजमाता मिल मेन्स व लेडीज वेअर दालनाचा अहिल्यानगरमध्ये ९ ऑक्टोबर रोजी शुभारंभ

## १५ हजार स्क्वेअर फुटाच्या पाच मजली प्रशस्त वास्तूत मनपसंत कपडे खरेदीचा आनंद



नगर - होलसेल दरात डिझाईनर, फॅशनेबल साड्यांची मोठी शृंखला उपलब्ध करून देत महिला ग्राहकांची प्रथम पसंती मिळवणाऱ्या सर्जेपुरा येथील राजमाता साडी या दालनाने आता राजमाता मिल मेन्स व लेडीज वेअर हे नूतन भव्य शोरुम सुरु करीत आहे. सर्जेपुरा येथील पु.ना. गाडगीळ ज्वेलर्स शेजारी १५ हजार स्क्वेअर फुटाच्या ५ मजली प्रशस्त जागेत राजमाता मिलमध्ये पुरुष व महिला ग्राहकांना निवांतपणे मनपसंत खरेदीचा आनंद घेता येणार आहे. या दालनाचा शुभारंभ ९ ऑक्टोबर रोजी होणार आहे.

राजमाता परिवाराने राजमाता साडी या दालनव्दारे यशस्वी प्रवास करून ग्राहकांची मने जिंकली आहे. उच्च गुणवत्ता, अतिशय रास्त दर आणि नवनवीन भरपूर व्हरायटी या दालनाचे वैशिष्ट्ये आहे. याच प्रवासाचा पुढील टप्पा म्हणून राजमाता मिल मेन्स व लेडीज वेअर खुले होत आहे. देशभरातील नामांकित मिल्स मधील लेडीज, मेन्स वेअर थेट या नवीन दालनात उपलब्ध होतील. मेन्स वेअरमध्ये शेरवानी, जोधपुरी, इंडो वेस्टर्न, मोदी जॅकेटस, डिझायनर कुर्ता, सुटिंग, शर्टिंगची मोठी व्हरायटी येथे असणार आहे. सण समारंभ, विशेष प्रसंगाला अनुरुप कपडे येथे खरेदी करता येणार आहेत.

लेडीज वेअरमध्ये युवती, महिलांची आवड निवड ओळखून मोठी व्हरायटी उपलब्ध करून देण्यात आली आहे. यात क्रॉप टॉप, वन पीस, क्रॉड सेट, सिंगार सूट अशा विविध प्रकारच्या लेडीज वेअरचा समावेश असेल. लेडीज व मेन्स वेअरसाठी स्वतंत्र दालन असून प्रत्येकाला निवांत वातारवणात खरेदीचा आनंद लुटता येणार आहे. दिवाळीचा सण नजीक आल्याने घरोघरी नवीन कपडे खरेदीची तयारी सुरु झाली आहे. या मोठ्या उत्सवाचा आनंद व्दिगुणित करणारी कपड्यांची व्हरायटी अतिशय रास्त दरात राजमाता मिल येथे उपलब्ध होत आहे.

ग्राहकांनी आपली खरेदी संस्मरणीय व आकर्षक करण्यासाठी दालनास भेट देण्याचे आवाहन राजमाता परिवाराने केले आहे.



हिंद सेवा मंडळ सेवकांच्या पतपेढीच्या चेअरमनपदी सारडा महाविद्यालयाचे उपप्राचार्य मिलिंद देशपांडे यांची नयुक्ती झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना महाविद्यालयाचे कनिष्ठ विभागाचे चेअरमन डॉ.पारस कोठारी आदी.

# हिंद सेवा मंडळ सेवकांच्या पतपेढीच्या चेअरमनपदी सारडा महाविद्यालयाचे उपप्राचार्य मिलिंद देशपांडे

नगर - हिंद सेवा मंडळ सेवकांच्या पतपेढीच्या चेअरमनपदी सारडा महाविद्यालयाचे उपप्राचार्य मिलिंद देशपांडे यांची सर्वानुमते नियुक्ती झाली आहे. या नियुक्तीनंतर सारडा महाविद्यालयाच्या वतीने महाविद्यालयाचे कनिष्ठ विभागाचे चेअरमन डॉ.पारस कोठारी यांनी त्यांचा सत्कार करून अभिनंदन केले आहे. यावेळी प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित, प्रबंधक अशोक असेरी, उपप्राचार्य गिरीश पाखरे, पर्यावेक्षक महेश कुलकर्णी, सुजित कुमावत, राजू रिक्कल आदींसह प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

डॉ.पारस कोठारी म्हणाले, सहकार क्षेत्राची मोठी वैभवशाली परंपरा जिल्ह्याला आहे. ही परंपरा जपत संस्थेतील शिक्षक व प्राध्यापक हे चांगले शैक्षणिक कार्याबरोबरच सहकार क्षेत्रातही उत्तमप्रकारे काम करून पतपेढी नावारूपाला आणली आहे. उपप्राचार्य मिलिंद देशपांडे हे चांगले अनुभवी आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली या पतपेढीचा अजून विकास होईल.

प्राचार्य माहेश्वरी गावित यांनीही यावेळी शुभेच्छा दिल्या. मिलिंद देशपांडे यांनी केलेल्या सत्काराबद्दल आभार मानले.

# अहिल्यानगर मनपा कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी विजय कोतकर तर व्हाईस चेअरमनपदी किशोर कानडे बिनविरोध



महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी विजय कोतकर तर व्हाईस चेअरमनपदी किशोर कानडे यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. (छाया - लहू दळवी)

नगर - महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी विजय कोतकर तर व्हाईस चेअरमनपदी किशोर कानडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी महेश पालवे यांच्या अध्यक्षतेखाली ही निवड प्रक्रिया पार पडली. चेअरमनपदासाठी विजय कोतकर यांच्या नावाची सूचना संचालक शेखर देशपांडे यांनी मांडली, तर अनुमोदन संचालक कैलास चावरे यांनी दिले. त्याचप्रमाणे व्हाईस चेअरमनपदासाठी किशोर कानडे यांच्या नावाची सूचना कैलास चावरे यांनी मांडली, तर सतीश ताठे यांनी अनुमोदन दिले. बलराज गायकवाड यांनीही या निवडीस समर्थन दर्शविले. या निवड प्रक्रियेस माजी अध्यक्ष विकास गीते, ज्येष्ठ संचालक बाबासाहेब मुदगल, तज्ञ संचालक जितेंद्र सारसर, संचालक बाळासाहेब गंगेकर, अजय कांबळे, गुलाब गाडे, सोमनाथ सोनवणे, बाळासाहेब पवार, प्रमिला पवार, कार्यलक्षी संचालक आनंद तिवारी आदी उपस्थित होते. तसेच सभासद उपस्थित राहून नूतन पदाधिकाऱ्यांचे स्वागत केले.

यावेळी चेअरमन विजय कोतकर म्हणाले, संचालक मंडळाने माझ्यासारख्या नवीन संचालकावर विश्वास ठेवून चेअरमन पदाची जबाबदारी सोपविली आहे, याबद्दल मी सर्वांचे आभार मानतो. सभासद व मनपा कर्मचारी यांच्या हितासाठी पारदर्शक निर्णय घेण्यावर माझा भर राहील. पतसंस्थेचा कारभार पारदर्शक ठेवून संस्थेला यशाच्या शिखरावर नेण्याचा प्रयत्न करू. सर्व संचालक व सदस्यांना सोबत घेऊन चांगले कार्य करणार असून, पदाला न्याय देण्याचा प्रयत्न करेन असे ते म्हणाले.

व्हाईस चेअरमन किशोर कानडे यांनीही सर्वांचे आभार मानत संस्थेच्या प्रगतीसाठी नूतन संचालक मंडळाच्या माध्यमातून एकजुटीने काम करण्याची ग्वाही दिली.

ज्येष्ठ संचालक बाबासाहेब मुदगल यांनी यावेळी पतसंस्थेच्या कारभाराचा आढावा घेत संस्थेने गेल्या काही वर्षांत साधलेल्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले.

कार्यलक्षी संचालक आनंद तिवारी यांनी नूतन चेअरमन विजय कोतकर व व्हाईस चेअरमन किशोर कानडे यांचे अभिनंदन करून पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

# सेफ स्टेप्स फाऊंडेशनतर्फे अमेरिकेतील तज्ञ डॉक्टरांचा व्हिडिओद्वारे परिसंवाद



सेफ स्टेप्स फाऊंडेशनतर्फे अमेरिकेतील तज्ञ डॉक्टरांचा व्हिडिओद्वारे परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.

नगर - सेफ स्टेप्स् फाऊंडेशनने नुकताच वृध्दत्वाकडे वाटचाल करणाऱ्या भारतवासियांसमोर उभ्या असणारा धोका लक्षात घेऊन वयोवृध्दांना उठून बसण्यासाठी अथवा उभे राहण्यासाठी घ्यावयाच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना त्या वृध्दांची काळजी घेणाऱ्या सांभाळणाऱ्यांना प्रशिक्षण तसेच घरातील तत्संबंधी सुरक्षिततेच्या उपायांवर आधारीत अमेरिकेतील डॉ. श्रुती पटेल, (पी.टी., डि.पी.टी.) होम हेल्थ फिजिकल थेअरपिस्ट आणि सेफ फाऊंडेशनच्या सह-संस्थापक यांनी व्हिडीओद्वारे परिसंवादाचे आयोजन ४ ऑक्टोबर रोजी ज्येष्ठ नागरीक संघ, मुकुंदनगर, अ.नगर येथे करण्यात आले होते.

वृध्द व वृध्दत्वाकडे वाटचाल करणाऱ्यांनी उठून बसतांना, उभे राहतांना खाली पडणे ही अपघाताची बाब नव्हे ती पुर्वानुमान करता येणारी आणि टाळता येणारी गोष्ट आहे, असे अमेरिकेतील फिजिकल थेरअपिस्टच्या डॉक्टर आणि सेफ स्टेप्स् फाऊंडेशनच्या सह-संस्थापक डॉ. ध्रुती पटेल यांनी सांगितले. त्या असेही म्हणाल्या की, साध्या आणि सोप्या उपायांद्वारे उदा. संतुलनाचे प्रशिक्षण, सुरक्षित घरगुती वातावरण आणि वृध्दांची देखरेख करणाऱ्यांच्या जागरूकतेमुळे आपण अशा वृध्द व्यक्तींना सुरक्षित व स्वालंबी ठेऊ शकतो.

उभे या व्हिडीओ परिसंवादामध्ये वृध्दांची देखरेख करणाऱ्यांनी वयोवृध्दांना अधिक आत्मविश्वासाने कसे पाऊल उचलावेत. संभाव्य धोके कसे टाळता येतील तसेच सुरूवातीच्या लक्षणाची ओळख कशा प्रकारे करता येतील. याबाबत विस्तृत मार्गदर्शन केले. जेव्हा आपल्या वयोवृध्द प्रियजनांना उठून बसतांना राहतांना तोल जाऊन पडल्याचा प्रसंग घडतो, तेव्हा त्यांची काळजी घेणारे, देखरेख करणारे हतबल होतात. अशा गोष्टींवर मात करण्यासाठी वृध्दांची काळजी घेणाऱ्यांना पुरेसे प्रशिक्षित करणे गरजेचे असून तत्संबंधीच्या उपाययोजना प्रामुख्याने करणे अत्यावश्यक आहे, असेही त्या शेवटी म्हणाल्या.

भारतातील अनेक ज्येष्ठ नागरिकांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाकीची आहे. काही ज्येष्ठ नागरिक निराधार अवस्थेत जीवन जगत आहेत. वृध्दापकाळात त्यांना विविध शारीरीक व्याधी जडलेल्या असतात. औषधोपचार घेण्यासाठी त्यांच्याकडे पैसे नसतात आणि त्यांना कोणी आर्थिक मदतही करीत नाही. शिवाय केंद्र व राज्य शासनाच्या ज्येष्ठ नागरिकांसाठी योजना अपुऱ्या पडत आहे. अशा परिस्थितीत 'सेफ स्टेप्स् फाऊंडेशन' इतर सेवाभावी संस्थेच्या मदतीने संपुर्ण भारत देशात सदरील उपक्रम राबविण्याचा मानस असल्याचे प्रतिपादन सेफ स्टेप्स् फाऊंडेशचे अध्यक्ष मजहर मिर्झा यांनी केले. याप्रसंगी वयोवृध्दांच्या कुटुंबियांना वृध्दत्व अधिक सुरक्षित, आरोग्यदायी आणि सन्मानजनक होईल, या दृष्टीने शिबीरातील उपस्थितांना 'सेफ स्टेप्स् फाऊंडेशन' तर्फे व्यायाम-पत्रिकेचे, विना-मुल्य, वाटप करणेत आले.

# आंतरराष्ट्रीय सहकारी वर्षनिमित्त 'सहकार'वर युवक, युवतींच्या वक्तृत्व स्पर्धेचे नगरला आयोजन

## जिल्ह्यातील महाविद्यालयीन युवक युवतींनी सहभाग नोंदवा : जिल्हा बोर्ड चेअरमन सौ. जयमाला सोलेपाटील

नगर - आंतरराष्ट्रीय सहकारी वर्ष २०२५ निमित्त केंद्र व राज्य शासनाच्या सुचनेनुसार वरिष्ठ महाविद्यालयीन युवक युवतींचा सहकारी चळवळीमध्ये सहभाग वाढावा, सहकारी चळवळीची माहिती व्हावी या उद्देशाने अहिल्यानगर जिल्ह्यातील महाविद्यालयातील युवक-युवती करीता जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन अहिल्यानगर येथील सहकार महर्षी गोपळरावजी सोलेपाटील सहकार प्रशिक्षण केंद्र, चाहूराणा बु. मार्केट यार्डच्या मागे येथे १४ ऑक्टोबर रोजी आयोजित केले असून या स्पर्धेत जिल्ह्यातील युवक युवतीने सहभाग नोंदण्याचे आवहान दि अहिल्यानगर डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह बोर्डाचे चेअरमन सौ. जयमाला भारत सोलेपाटील यांनी केले आहे.

महाराष्ट्र राज्यात सहकारी शिक्षण, प्रशिक्षण, प्रचार व प्रसिध्दीचे कार्य करणाऱ्या महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्या, पुणे यांचेवतीने आणि जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहिल्यानगर, दि अहिल्यानगर डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह बोर्ड लि. व अहिल्यानगर जिल्हा परिषद सर्व्हन्ट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. यांचे संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन केले असल्याची माहिती प्रभारी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था सौ. डॉ.शुभांगी गौड यांनी दिली.

या जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचा विषय सहकारातून रोजगार निर्मिती असा असून यास्पर्धेत प्रथम येणाऱ्या स्पर्धकास प्रमाणपत्र, ट्रॉफी व रोख रक्कमचे बक्षीस देण्यात येणार असून प्रथम येणाऱ्या स्पर्धकास महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्या. पुणे यांचे वतीने पुणे येथे नोव्हेबर महिन्यात आयोजित करण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत सहभागी होता येणार आहे स्पर्धेत सहभागासाठी प्रवेश फि रु. १०० असणार आहे.

यासाठी मोबाईल नंबर ९९२२५७२७३३ वर संपर्क साधण्याचे आवाहन श्रीमती वैजयंता मानकर, जिल्हा सहकार विकास अधिकारी, दि अहिल्यानगर डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह बोर्ड यांनी केले आहे.

# दिव्यांगास मिळाला जयपूर फुटवेअरचा आधार



आमदार शिवाजीराव कर्डीले यांच्या सूचनेमुळे दिव्यांगास मिळाला जयपूर फुटवेअरचा आधार मिळाला. (छाया - लहू दळवी)

नगर - तालुक्यातील रहिवासी असलेले दिव्यांग शिवाजी जवरे हे एक पाय नसल्याने गेल्या अनेक वर्षांपासून शासकीय सवलती आणि सुविधांपासून वंचित राहिले होते. हालचाल करणे कठीण झाल्याने कोणत्याही कार्यालयात जाणे शक्य नव्हते. त्यामुळे दिव्यांग सर्टिफिकेटपासून ते मदतीच्या विविध योजना या सर्वच गोष्टींपासून ते दूर राहिले.

नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे तालुक्यातील अनेक गावे पूरग्रस्त झाली होती. या भागांची पाहणी करत असताना आमदार शिवाजीराव कर्डीले यांनी पाथर्डीतील दौऱ्यात दिव्यांग शिवाजी जवरे यांची आपुलकीने विचारपूस केली. जवरे यांनी आपल्या अडचणी सांगितल्यानंतर आमदार कर्डीले भावुक झाले. त्यांनी तात्काळ आपल्या स्वीय सहाय्यक अमोल धाडगे यांना संपर्क साधण्याचे निर्देश देऊन भाजपा दिव्यांग विकास आघाडीचे जिल्हाध्यक्ष वसंत शिंदे यांना या प्रकरणी तातडीने मदत करण्यास सांगितले. या दिव्यांग बांधवाला सर्वतोपरी मदत मिळालीच पाहिजे, कुठे अडचण आली तर मला थेट फोन करा, अशी सूचना आमदार कर्डीले यांनी दिली.

आमदारांच्या सूचनेनंतर भाजपा दिव्यांग विकास आघाडीचे जिल्हाध्यक्ष वसंत शिंदे, महिला अध्यक्षा आशाताई गायकवाड, जिल्हा उपाध्यक्षा विजयाताई बडे, उपाध्यक्ष चंद्रकांत काळे, ईश्वर गुंड तसेच तालुका अध्यक्ष श्रीकांत काळे, संजय गांधी निराधार अनुदान समिती नगर तालुका सदस्य बाबासाहेब धिवर यांनी तातडीने काम हाती घेतले. त्यांनी शिवाजी जवरे यांच्याशी संपर्क साधून प्रथम ऑनलाईन दिव्यांग सर्टिफिकेट काढून देण्यास मदत केली. त्यानंतर डॉ. विखे पाटील हॉस्पिटल येथून जयपूर फुटवेअरचा कृत्रिम पाय मिळवून देण्यासाठी पाठपुरावा केला. या कामात डॉ. आनाप यांचे सहकार्य लाभले.

काही दिवसांच्या प्रयत्नानंतर दिव्यांग शिवाजी जवरे यांना जयपूर फुटवेअरचा एक पाय बसविण्यात आला. चालण्यास सक्षम झाल्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हसू फुलले. आमदार कर्डीले आणि वसंत शिंदे नसते तर हे शक्य झाले नसते. आता मी पुन्हा चालू शकतो, हे माझ्यासाठी नवजीवन आहे, असे जवरे यांनी सांगितले.

## यंदा शब्दबाणांनी होणार ऑपरेशन सिंदूर

# नगरकरांची आवडती - पं. दीनदयाळ व्याख्यानमाला

प्रत्येक देशाचे, प्रत्येक शहराचे एक गुणवैशिष्ट्य असते. एक स्वभाव असतो. आपले नगर ऐतिहासिक अन् अध्यात्मिकदृष्ट्या लक्षणीय आहे.

भुईकोट किल्ला असो वा अवतार मेहेरबाबा, आचार्य श्री आनंदऋषीजींचे अस्तित्त्व! लष्करीदृष्ट्या मोठे ठिकाण असलेल्या नगरीत कला, सांस्कृतिक अधिष्ठानही लाभले आहे.

कानामात्रा नसलेल्या नगरीला आता पुण्यश्लोक अहिल्याबाईंचे नाव मिळालयं. नव्या नावाच्या, नव्या पिढीने शहराच्या सर्वांगिण प्रगतीची आस धरली आहे. यात व्यापार उद्योगांसह कला, आर्थिक, सांस्कृतिक, क्रीडा, नाट्य क्षेत्रातही नाविन्यपूर्ण मोठे काम करण्याचा प्रयत्न दिसून येतोय. यात सगळ्यांनी मिळून योगदान दिला तर खऱ्या अर्थाने शहराची प्रगती होईल यात शंका नाही. सुदैवाने पुढील काही महिन्यात येणाऱ्या नगरपालिका प्रतिनिधींना (नगरसेवक इ.) यासाठी आपण नगरकरांनी गळ टाकून पाठपुरावा करता येईल.

विकास केवळ आर्थिकदृष्ट्या नसतो तर बौद्धीक, मानसिक, अध्यात्मिक असावा. सध्याच्या गोंधळलेल्या व स्वार्थांध वातावरणात समाजासाठी व्यापक भावनेने कार्य करण्याची मोठी आवश्यकता आहे. आपल्या शहरात यासाठी एक वैचारिक चळवळ दशकापूर्वी सुरू झाली ज्यात शहर, राज्य, राष्ट्रभक्ती, शक्ती व देशप्रेमाच्या विचारांना जागृत करुन नगरकरांना बौद्धिक उंची देण्याचा प्रयत्न होत आहे. कोरोना वर्ष वगळता सुरू असलेल्या या ज्ञानगंगेने नगरवासियांच्या मनातला गोंधळ, गढूळता व उदासिनता दूर करण्याचा प्रभावी प्रयत्न चालवला आहे. सूज्ञ व जबाबदार नागरिकही या व्याख्यानमालेस उत्स्फुर्त प्रतिसाद देत आहेत. यावरुन शहराची वैचारिक उंचीही वाढली आहे.

आतापर्यंत राष्ट्रीय पातळीवरील प्रखर, अभ्यासू वक्ते या व्याख्यानमालेत येवून गेलेत. मागील वर्षी तर आलेल्या अनुभवसंपन्न वक्त्यांना श्रोत्यांनी अक्षरश: डोक्यावर घेतले होते.

यावर्षीही प्रसिद्ध वक्त्यांद्वारे महत्त्वाच्या विषयांवर विचारांचे सोने लुटता येईल आणि या वैचारिक मेजवानीने दिवाळीचा फराळ अधिकच गोड होईल हा नजराणा फेसबुक, व सोशल मिडीयावर लाईव्ह पाहू शकता.

सध्याच्या अमेरिकेने टॅरीफ युद्धाद्वारे तर शेजाऱ्याने छुप्या युद्धाने आपणास त्रास देण्याचे सुतोवाच दिले असताना जगाच्या बदलत्या परिस्थितीवर ऐकण्यास मिळेल तर नगरकरांना परिचीत असलेले आपले विश्वास नांगरे पाटील राष्ट्रप्रेमातून युवकांना प्रेरणा देतील. याशिवाय काळाचा आवाज असलेले आवाजाचे किमयागार हरिष भिमाणी, धडाडीच्या महिला मा. खासदार नवनीत राणा, नगरचे सुपुत्र भाजपाचे मा. राष्ट्रीय उपाध्यक्ष श्यामजी जाजू व डॉ. सुधा कांकरिया इ. येणार आहेत.

योगायोगाने यावर्षीही केरळचे महामहिम राज्यपाल राजेंद्र आर्लेकर हे उद्‌घाटक असतील. यावर्षीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य असणार ते म्हणजे राष्ट्रीय मुस्लीम मंचचे अध्यक्ष फैज खान यांचे व्याख्यान सध्याच्या वातावरणात ते एकता, बंधुता व राष्ट्रप्रेम इस्लामी संस्कृतीचे खरे तत्त्व यावर बोलणार आहे. या व्याख्यानावर मोठी उत्सुकता लागली आहे. हिंदू मुस्लीम यापेक्षाही राष्ट्र प्रथम हा महत्त्वाचा मुद्दा आहे.

पं. दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान व पतसंस्थेला नावारुपाला आणणाऱ्या वसंत लोढा यांच्या अथक प्रयत्नाने या व्याख्यानमालेला यशाची व गौरवाची फळे, फुले आली आहेत. ती अधिक बहरावी या शुभेच्छा. अर्थात यासाठी विविध मान्यवर पदाधिकारी, कार्यकर्ते व इतर सहकार्य करत असतात. तात्पर्य, शहराच्या बौद्धीक, वैचारिक उत्थानासाठी ही व्याख्यानमाला तसेच जिल्हा वाचनालय व जैन सोशलची महावीर व्याख्यानमाला व इतरही विविध ज्ञानगंगा निरंतर चालू राहाव्यात. यातून विचारांची अदानप्रदान, चिंतन, मनन व कृती वाढावी हीच अपेक्षा.

**- किशोर गांधी** (दिशान फिचर्स)

# राष्ट्रीय पातळीवरील बॉक्सिंग स्पर्धेत अहिल्यानगर येथील खुशी जाधवने पटकावले महाराष्ट्रातील पहिले सुवर्णपदक

नगर – चेन्नई येथे भारतीय बॉक्सिंग महासंघाने, पहिली बी एफ आय कप, बॉक्सिंग टूर्नामेंट २०२५ चे आयोजन ३० सप्टेंबर ते ६ ऑक्टोबर या कालावधीत केले होते. या स्पर्धेत अहिल्यानगर जिल्हा बॉक्सिंग संघटनेची खेळाडू कु. खुशी दीपक जाधव हिने महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व ५४ किलो वजन गटात केले. तिने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत दिल्ली, हरियाणा, गुजरात व भारतीय पोलिस संघाच्या खेळाडूंचा एकतर्फी पराभव करीत अंतिम स्पर्धेत प्रवेश केला व अंतिम सामन्यात भारतीय पोलिस संघाच्या खेळाडूचा पराभव करत सुवर्ण पदकाला गवसणी घातली.

खुशी ही सिनियर गटात सुवर्ण पदक घेणारी अहिल्या नगर जिल्ह्याची किंबहुना महाराष्ट्राची प्रथम बॉक्सर ठरली आहे. तिच्या माध्यमातून महाराष्ट्राला पहिले सुवर्णपदक मिळाले आहे.



राष्ट्रीय पातळीवरील बॉक्सिंग स्पर्धेत अहिल्यानगरची खुशी जाधव हिची सुवर्ण पदकाला गवसणी, महाराष्ट्राला पहिले सुवर्णपदक पटकावले.

डॉक्टर जाधव कुटुंबीया साठी ह्या दिवाळीसाठी हा डबल धमाका ठरला आहे कारण खुशी जाधव हिची बहीण कु. ईश्वरी सचिन जाधव हिस राष्ट्रीय शालेय स्पर्धेत या वर्षी रौप्य पदक मिळाले आहे. ती सुद्धा कर्नल परबची विद्यार्थिनी आहे.

खुशी हिस दुसऱ्या इयत्तेत असल्यापासून कर्नल परब स्कूल मध्ये कर्नल परब की जे भारतीय सेनेतील एक उत्कृष्ट बॉक्सर होते. त्यांचे व परब मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले. तिने चवथ्या वर्गात असताना कब क्लास या गटात सुवर्ण पदक मिळवून सुरुवात केली व अनेक वर्ष सातत्यपूर्ण खेळ करून आज वरिष्ठ गटात सुवर्ण पदक प्राप्त केले.

आतापर्यंत तिला अहमदनगर जिल्हा बॉक्सिंग असोसिएशनचे प्रमुख शकील सर व पुणे येथील माजी ऑलिम्पिक खेळाडू मनोज पिंगळे यांचे मार्गदर्शन लाभले. गेल्या पाच वर्षापासून ती स्पोर्ट्स ऑथॉरिटी ऑफ इंडिया यांचे औरंगाबाद येथील केंद्रामध्ये प्रशिक्षण घेत आहेत. तेथे तिला भारतातील विविध उच्चशिक्षित प्रशिक्षकांचे प्रशिक्षण मिळत आहे.

# नगर कॉलेजच्या रुथबाई हिवाळे वक्तृत्व स्पर्धेत माऊंट सिनाय स्कूलची कु. गौरी शेडाळे प्रथम

नगर – अहमदनगर महाविद्यालय आयोजित रुथबाई हिवाळे वक्तृत्व स्पर्धेत सारोळा बद्दी येथील माऊंट सिनाय कॉन्व्हेन्ट स्कूलची विद्यार्थिनी गौरी शेडाळे हीने 'डिजिटल व्यसन : तरूणाईचे संकट' या विषयावर आपले विचार मांडून प्रथम क्रमांक पटकाविला. प्रथम क्रमांकासाठीचा चषक व रु.४००० महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.प्रतुल कसोटे यांच्या हस्ते स्विकारला. विद्यालयाच्या अंजली वायकर व अनामिका अवसरकर यांनीही या स्पर्धेत सहभाग घेतला होता.


रुथबाई हिवाळे वक्तृत्व स्पर्धेत माऊंट सिनाय स्कूलची गौरी शेडाळे प्रथम आल्याबद्दल तिला स्मृतीचिन्ह प्रदान करण्यात आले.

या यशाबद्दल विद्यालयाच्या वतीने गौरी शेडाळे हिचा मुख्याध्यापिका जयश्री खरात यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सर्व विद्यार्थ्यांना उज्वला पंडित व अश्विनी कोरडे यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल तिचे विद्यालयाचे संस्थापक डॉ. शाम खरात यांनी अभिनंदन केले आहे.


विभागीय बास्केटबॉल स्पर्धेसाठी निवड झालेल्या आयकॉन पब्लिक स्कूलच्या विद्यार्थिनी.

# आयकॉन पब्लिक स्कूलच्या विद्यार्थीनींची विभागीय बास्केटबॉल स्पर्धेसाठी निवड

नगर – अहिल्यानगर महानगरपालिका व जिल्हा क्रीडा कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या आंतरशालेय बास्केटबॉल (१४ वर्षांखालील मुलींच्या गटातील) स्पर्धेत द आयकॉन पब्लिक स्कूलच्या विद्यार्थीनींनी अतिशय उत्कृष्ट खेळ सादर करून सर्वांना प्रभावित केले. दमदार खेळ आणि संघभावनेच्या जोरावर आयकॉन संघाने प्रतिस्पर्धी संघावर दणदणीत विजय मिळवत पुणे येथे होणाऱ्या विभागीय बास्केटबॉल स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे.

आयकॉनच्या विजयी संघात ईश्वरी वाळूंज, रिशिका वांढेकर, आदिती सिंग, अवंतिका कळमकर, द्रिती गुजराथी, समृद्धी कोठारी, तेजस्विनी पाटील, ज्ञानदा हिंगे, श्रेया वर्मा आणि आरना कटारे या खेळाडूंचा समावेश होता. सर्व खेळाडूंनी उत्कृष्ट समन्वय, वेगवान हालचाली आणि अचूक रणनीतीच्या जोरावर मैदानावर वर्चस्व गाजवले.

संघाला शाळेचे क्रीडाशिक्षक व बास्केटबॉल कोच सचिन भापकर यांचे प्रभावी मार्गदर्शन लाभले. त्यांच्या प्रोत्साहनामुळे आणि नियमित प्रशिक्षणामुळे विद्यार्थिनींनी ही उल्लेखनीय कामगिरी साध्य केली.

संचालिका आराधना राणा व मुख्याध्यापिका दीपिका नगरवाला यांनी विजयी संघाचे अभिनंदन करत खेळाडूंच्या जिद्दीचे कौतुक केले. त्यांनी विद्यार्थिनींना पुढील विभागीय स्पर्धेत अधिक यश संपादन करण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

शरद मुथा एज्युकेशन सोसायटीच्या अंतर्गत चालवलेले द आयकॉन पब्लिक स्कूल हे अहिल्यानगरच्या मध्यवर्ती भागात स्थित एक सीबीएसई मान्यताप्राप्त शाळा आहे. नर्सरीपासून इयत्ता बारावीपर्यंतचे दर्जेदार शिक्षण देत असलेली ही संस्था शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे.

# अहिल्यानगर विभागस्तर जलतरण क्रीडा स्पर्धेस सुरुवात

नगर – क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित व अहिल्यानगर जिल्हा जलतरण संघटना यांच्या तांत्रिक सहकार्याने आयोजित विभागस्तर जलतरण क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन महाराष्ट्र शासनाचा जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित रमेश विपट, जिल्हा क्रीडा अधिकारी अहिल्यानगर ज्ञानेश्वर खरंगे, शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त विनय मराठे, मार्गदर्शक श्रीकांत शेटे, राष्ट्रीय पंच भूपेंद्र आचरेकर यांच्या हस्ते जलतरण तलावाला श्रीफळ वाहून स्पर्धेस सुरुवात करण्यात आली. स्पर्धेचे आयोजन क्रीडा मार्गदर्शक संतोष वाबळे, क्रीडा अधिकारी प्रियंका खंडे, विशाल गर्जे, प्रवीण कोंडावळे, भाऊराव वीर यांनी पाहिले.



याप्रसंगी जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांनी पुणे, सोलापूर, अहिल्यानगर या तीन जिल्ह्यातून आलेल्या खेळाडूंना संबोधित करून जलतरण क्रीडा स्पर्धेत १४, १७ व १९ या तीन वयोगटात मुले व मुली सहभागी होत असून जवळपास १०३ इव्हेंट चे आयोजन होणार असून या स्पर्धेत साधारणता १४०० खेळाडूंनी सहभाग घेतला. वाडिया पार्क येथील जलतरण तलाव नुकताच आपल्या स्पर्धेसाठी सुसज्ज करून स्पर्धा आयोजना करिता सुरू करण्यात आल्याचे त्यांनी सांगत शारीरिक शिक्षण घेतलेल्या चंद्रशेखर आगासे विद्यालयाचे त्यांचे गुरु प्राध्यापक मोरे सर यांचा उल्लेख केला. उत्कृष्ट खेळाडू तयार करणाऱ्या सर्व मार्गदर्शकांचेही श्री. खुरंगे यांनी स्वागत केले. सातत्याने स्पर्धेत सहभागी होत असलेल्या खेळाडूंना विभाग राज्य राष्ट्रीय स्पर्धेत यश प्राप्त करण्याकरिता शुभेच्छा त्यांनी दिल्या.

या स्पर्धा यशस्वी पार पाडण्यासाठी अहिल्यानगर जिल्हा जलतरण संघटनेचे सचिव रावसाहेब बाबर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वेश देशमुख, सारिका गांधी, संजय साठे, पूर्वा देशमुख, पंच बापूसाहेब गायकवाड, प्रणित ढोकणे, क्षितिज बाबर, विश्वेशा मिस्किन, अक्षदा पवार, गणेश मोरे, अखिल शेख, योगिता तनपुरे, अशोक टकले, सुभाष कनोजिया, सतीश गायकवाड यांनी काम पाहिले.

# सरस्वती विद्यालयाची खेळाडू प्रांजल पोटे हिला विभागीय तायक्कांदो स्पर्धेत सुवर्ण पदक

**राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड**



नगर – केडगाव येथील सरस्वती प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या खेळाडूने तायक्कांदो स्पर्धेत विभागीय पातळीवर यश संपादन केले आहे. पुणे येथे झालेल्या विभागीय तायक्कांदो स्पर्धेत शाळेची खेळाडू कु. प्रांजल पोटे हिने सुवर्ण पदक प्राप्त केले. तिचे छत्रपती संभाजीनगर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. तिच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष दादाराम ढवाण, सचिव प्रा. सोमनाथजी दिघे, व्यवस्थापन समिती अध्यक्ष प्रा. रावसाहेब पवार, सहकार्यवाह प्रा. रविंद्र चोभे व सर्व पदाधिकारी विद्यालयाचे मुख्याध्यापक संदीप भोर सर्व शिक्षक वृंद व पालकांनी तिचे अभिनंदन करुन पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. तिला क्रीडाशिक्षक अविनाश साठे यांचे लाभले.

मुख्याध्यापक संदीप भोर म्हणाले की, प्रांजल पोटे हिने विभागीय तायक्कांदो स्पर्धेत सुवर्ण पदक मिळवून आपल्या विद्यालयाचे व जिल्ह्याचे नाव उज्वल केले आहे. विद्यालयाच्या वतीने सातत्यपूर्ण खेळांना दिल्या जाणाऱ्या प्रोत्साहनाचे हे फलित आहे.

कठोर परिश्रम, सातत्य, शिस्त आणि आत्मविश्वासाने खेळात यश संपादन करता येते. विद्यालय केवळ शिक्षणातच नव्हे, तर क्रीडा, संस्कृती आणि सर्वांगीण विकासातही विद्यार्थ्यांना घडविण्यास कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# नगरच्या खेळाडूंची राष्ट्रीय स्तरावर चमक, चार सुवर्णपदकांची कमाई

## आदिश तानपुरे, किशोर शिंदे, अमोल गायकवाड, देवदत्त गुंडू या खेळाडूंनी जिंकले सुवर्णपदक

नगर – नवी दिल्ली येथे नुकत्याच झालेल्या WRPF तर्फे आयोजित राष्ट्रीयस्तरावरील पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिप २०२५ मध्ये अहिल्यानगरच्या खेळाडूंनी कामगिरी करत एकूण चार सुवर्णपदकांची कमाई केली आहे. या स्पर्धेत देशभरातील खेळाडूंमध्ये अहिल्यानगरच्या खेळाडूंनी आपल्या ताकदीचा ठसा उमटवत अभिमानास्पद यश संपादन केले. या स्पर्धेत आदिश तानपुरे यांनी सब ज्युनिअर १०० किलो गटात सुवर्णपदक मिळवले, तर किशोर शिंदे यांनी मास्टर १ कॅटेगरीत ८० किलो गटात सुवर्णपदक पटकावले. अमोल प्रभाकर गायकवाड यांनी सीनियर १०० किलो गटात सुवर्णपदक जिंकत राज्याचे नाव उंचावले. तसेच देवदत्त प्रविण गुंडू यांनी सीनियर १२५ किलो गटात जबरदस्त कामगिरी करत सुवर्णपदकावर नाव कोरले. या चौघांनी मिळवलेल्या सुवर्णपदकांमुळे नगर जिल्ह्याचा क्रीडा विश्वात गौरव झाला आहे.


नवी दिल्ली येथे नुकत्याच झालेल्या WRPF तर्फे आयोजित राष्ट्रीयस्तरावरील पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिप २०२५ मध्ये अहिल्यानगरच्या खेळाडूंनी कामगिरी करत एकूण चार सुवर्णपदकांची कमाई केली आहे.

या सर्व खेळाडूंना अहिल्यानगरचेच आंतरराष्ट्रीय चॅम्पियन देवदत्त प्रविण गुंडू यांनी प्रशिक्षण दिले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूंनी नियमित सराव करून राष्ट्रीय स्पर्धेसाठी आवश्यक तयारी केली होती. देवदत्त गुंडू यांच्या शिस्तबद्ध प्रशिक्षण पद्धतीमुळेच हे खेळाडू राष्ट्रीय स्तरावर सुवर्ण कामगिरी करू शकले, असे मत क्रीडाविश्वात व्यक्त होत आहे.

या विजयी खेळाडूंनी आपला सराव अहिल्यानगर येथील अजिंक्य'ज फिटनेस वर्ल्ड जिम मध्ये केला होता.

या विजयानंतर सर्व विजेत्या खेळाडूंनी WRPF महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष सौरभ चौधरी व शीतल मॅडम चौधरी, तसेच WRPF इंडियाचे अध्यक्ष सुनील लोचाब यांचे आभार मानले. त्यांच्या प्रोत्साहनामुळे व संघटनेच्या पाठबळामुळेच राष्ट्रीय स्तरावर स्पर्धा गाठता आली, असे खेळाडूंनी सांगितले.

# शालेय सॉफ्टबॉल स्पर्धेत समर्थ विभागीय पातळीवर

नगर – अहिल्यानगर महानगरपालिका व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्यावतीने घेण्यात आलेल्या शालेय सॉफ्टबॉल स्पर्धेत येथील श्री समर्थ विद्यामंदिर प्रशाला सावेडी विभागातील १७ वर्षे वयोगटातील मुलांच्या संघाने जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळविला. या संघाची पुणे विभागीय पातळीवर निवड झाली.

संघातील खेळाडू नील शिरसाट, कॅप्टन अर्चीत कवडे, अभय खंडागळे, वल्लभ गायकवाड, देवेंद्र राऊत, तन्मय फुले, आयुष हापसे, वेदांत लटके, कृष्णा टेंभुरकर, वेदांत मते, रुद्र फुलपगार, कार्तिक कुलकर्णी, तनिष्क वालझाडे, सार्थक गायकवाड, भाग्योदय जाधव, श्रेयस जायभाय आदी खेळाडूंनी दैदिप्यमान यश मिळवत जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवला आहे. वरील सर्व खेळाडूंना क्रीडा विभाग प्रमुख पी. पी. लोंढे यांचे प्रशिक्षण व मार्गदर्शन लाभले.


अहिल्यानगर महानगरपालिका व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्यावतीने घेण्यात आलेल्या शालेय सॉफ्टबॉल स्पर्धेत श्री समर्थ विद्यामंदिर प्रशाला १७ वर्षे वयोगटातील मुलांच्या संघाने जिल्ह्यात प्रथम क्रमांक व पुणे विभागीय पातळीवर निवड झाल्याबद्दल सत्कार समारंभ प्रसंगी शालेय समिती चेअरमन ॲड. किशोर देशपांडे, संस्थेचे सचिव सुरेश क्षीरसागर, प्रशालेच्या प्राचार्या श्रीमती संगीता जोशी, पर्यवेक्षक सुनील कानडे, क्रीडा विभाग प्रमुख पी.पी. लोंढे. (छाया–उदय जोशी)

उज्वल यश संपादन करणाऱ्या सर्व खेळाडूंना संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी तसेच शालेय समिती चेअरमन ॲड. किशोर देशपांडे, संस्थेचे सचिव सुरेश क्षीरसागर, प्रशालेच्या प्राचार्या श्रीमती संगीता जोशी, पर्यवेक्षक सुनील कानडे, सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.

# राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेसाठी कुलकर्णीज् ॲकॅडमीच्या विद्यार्थ्यांची निवड

नगर – अहिल्यानगर येथे पार पडलेल्या शालेय विभागीय जलतरण स्पर्धेमध्ये पुणे, सोलापूर आणि अहिल्यानगर या तीन जिल्ह्यामधून निवड झालेल्या शालेय विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यामध्ये अहिल्यानगर येथील मध्यवर्ती परिसरातील कुलकर्णीज स्विम ॲण्ड रिसर्च अकॅडमी संचलित सिद्धीबाग जलतरण तलाव येथे प्रशिक्षण घेणाऱ्या वाल्मीक गणेश कुलकर्णी याने १७ वर्षे मुलांच्या वयोगटामध्ये १०० मीटर फ्रीस्टाइल, ५० मीटर फ्रीस्टाइल आणि ५० मीटर बटरफ्लाय स्ट्रोक तर १९ वर्षे मुलींच्या वयोगटात ईश्वरी उगले हिने ८०० मीटर फ्रीस्टाईल या प्रकारात चुरशीची लढत देऊन दुसऱ्या क्रमांकासह राज्यस्तरावर आपले स्थान पक्के केले व लातूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेमध्ये निवड होऊन संघात स्थान मिळविले.



राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेसाठी कुलकर्णीज् अकॅडमीच्या विद्यार्थ्यांची निवड झाली.

या संस्थेच्या यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये १७ वर्ष वयोगटात रणविजय घोरपडे याने ४०० फ्री स्टाईल मध्ये तिसरा व २०० फ्रीस्टाइल या प्रकारामध्ये चौथा क्रमांक मिळविला, १४ वर्ष मुलांच्या वयोगटात श्लोक देशपांडे याने २०० मीटर वैयक्तिक मिडले प्रकारामध्ये तिसरा क्रमांक, १७ वर्षे वयोगटातील मुलींमध्ये चैत्राली धर्माधिकारी हिने ४०० मीटर फ्रीस्टाईल मध्ये तृतीय क्रमांक, १९ वर्षे वयोगटातील मुलींमध्ये ईश्वरी उगले हिने १०० मीटर बॅकस्ट्रोक आणि ४०० मीटर फ्रीस्टाईल मध्ये तृतीय क्रमांक, १४ वर्षे वयोगटातील मुलींमध्ये त्रिवेणी पंडित हिने २०० मीटर बटरफ्लाय स्ट्रोक या प्रकारात चौथा क्रमांक तर सिद्धी देशपांडे हिने त्याच वयोगटात २०० मीटर बॅकस्ट्रोक मध्ये चौथा क्रमांक, १७ वर्षांच्या मुलींमध्ये ४०० मीटर फ्रीस्टाइल प्रकारामध्ये स्वरा तांबे हिने चौथा क्रमांक प्राप्त केला.

संस्थेचे संचालक व प्रशिक्षक गणेश कुलकर्णी आणि सौ. भूपाली कुलकर्णी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. जलतरण प्रशिक्षिका मेघना कुलकर्णी आणि मार्गदर्शक गणेश कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी हे यश मिळविले.

# 'एसडी स्पोर्ट्स क्लब'च्या खेळाडूंची राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेसाठी निवड

नगर – ६ ऑक्टोबरला क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य आणि जिल्हा क्रीडा कार्यालय, अहिल्यानगर आयोजित विभागीय जलतरण स्पर्धा वाडिया पार्क जलतरण तलावात पार पडल्या. अहिल्यानगर, पुणे, सोलापूर या जिल्ह्यातून तब्बल १४०० स्पर्धकांनी आपली हजेरी नोंदवली. अहिल्यानगरचे जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे यांनी स्पर्धेचे उद्घाटन करत खेळाडूंचे मार्गदर्शन केले.


विभागीय जलतरण स्पर्धेत श्रेयश अमृत वन्नम याने १७ वर्षाखालील वयोगटात २०० मी आणि १०० मी. ब्रेस्टस्ट्रोक या क्रीडा प्रकारात द्वितीय क्रमांक पटकावला व लातूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेसाठी त्याची निवड झाल्याबद्दल SD स्पोर्ट क्लबचे संचालक सतीश ढवन व संचालिका सौ. ज्योती ढवन यांनी श्रेयशचा सत्कार केला. समवेत प्रशिक्षक जय बोरा.

या स्पर्धेमध्ये सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये शिकत असलेल्या श्रेयश अमृत वन्नम याने १७ वर्षाखालील वयोगटात २०० मी आणि १०० मी. ब्रेस्टस्ट्रोक या क्रीडा प्रकारात द्वितीय क्रमांक पटकावला. तसेच १६ ते १८ ऑक्टोबरला लातूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेसाठी त्याची निवड झाली आहे.

श्रेयश हा तपोवन रोड येथे असलेल्या SD स्पोर्ट्स क्लब जलतरण तलावात प्रशिक्षक जय बोरा यांच्या मार्गदर्शनाखाली दररोज सराव करतो. SD स्पोर्ट क्लब चे संचालक सतीश ढवन व संचालिका सौ. ज्योती ढवन यांनी श्रेयश चा सत्कार करून अभिनंदन केले. सेंट विवेकानंद स्कूल मधील प्रा. गीता तांबे, प्रा. कंचन पापडेजा, अमोल धोपावकर आणि डॉ. समीर होळकर व डॉ. धनश्री होळकर यांनीही या खेळाडूचे अभिनंदन देत पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# अकोले येथे वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय, आवश्यक पदांना मान्यता

नगर – अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले येथे दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर स्थापन करण्यास झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

अकोले येथे सध्या दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तरची दोन न्यायालये कार्यरत आहेत. नागरिकांच्या सोयीसाठी अकोले येथे दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर न्यायालयाची स्थापना करण्यास मुंबई उच्च न्यायालयाने मंजुरी दिलेली आहे. या न्यायालयासाठी २१ नियमित पदे मंजूर करण्यात आले आहेत व चार पदांसाठी मनुष्यबळाच्या सेवा बाह्य यंत्रणेद्वारे घेण्यास मान्यता देण्यात आली. यासाठी वेतन व वेतनेत्तर, तसेच अन्य खर्चासाठी २ कोटी ७९ लाख ३५ हजार ९३४ रुपयांच्या तरतुदीस मान्यता देण्यात आली.

# पाणीपुरीसाठी रस्त्यात बसकण!



पाणीपुरी सर्वांचाच आवडता प्रकार. आवडत्या ठिकाणाची पाणीपुरी खाण्यासाठी अनेकजण लांबपर्यंत जातात; पण नुकताच याच पाणीपुरीवरून राडा झाला आहे. हा किस्सा वाचून तुम्ही डोक्यालाच हात लावाल. पाणीपुरीवरून रस्त्यात राडा झाल्याची ही घटना गुजरातमध्ये घडली आहे. वडोदरा येथे घडलेल्या या घटनेमुळे पोलिस आणि प्रवाशांचा चांगलाच गोंधळ उडाला.

एका महिलेने सूरसागर तलावाजवळ रस्त्यावर चक्क आंदोलन केले, तेही पाणीपुरीसाठी! झाले असे की, पाणीपुरीच्या स्टॉलवर दोन पाणीपुरी कमी दिल्याने एक महिला नाराज झाली होती. त्याचा निषेध नोंदवत ती चक्क रस्त्यावर बसली आणि संपूर्ण वाहतूकच ठप्प झाली. तिला वीस रुपयांमध्ये सहाऐवजी फक्त चार पाणीपुरी देण्यात आल्या. त्यामुळे ती नाराज झाली. तिने पाणीपुरी विक्रेत्याला उरलेल्या दोन पुऱ्या देण्यास सांगितले; पण तिची मागणी काही पूर्ण झाली नाही. ते पाहून ती एवढी नाराज झाली, की एखाद्या लहान मुलासारखी रस्त्यावर फतकल मारून रडू लागली. तिच्या या निषेधामुळे लोक तर पाहू लागलेच; पण काही वेळातच रस्त्यावर वाहनांची लांब रांग लागली आणि संपूर्ण रस्ता अडवला गेला.

या घटनेची माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी पोहोचले. त्यांनी महिलेला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला, पण ती ऐकायला तयार नव्हती. रडत रडत तिने पोलिसांना सगळे सांगितले आणि म्हणाली, 'हा पाणीपुरी विक्रेता सर्वांना सहा पुऱ्या देतो; पण त्याने मला दोन कमी दिल्या आहेत. एकतर मला आणखी दोन पुऱ्या द्या नाहीतर त्याचे दुकान येथून काढून टाका.' पाणीपुरीच्या दोन पुऱ्यांवरून सुरू असलेले हे नाटक बराच वेळ चालले. अखेर बऱ्याच प्रयत्नांनंतर पोलिसांनी महिलेला तेथून निघून जाण्यास भाग पाडले आणि वाहतूक कोंडी दूर झाली. या घटनेची संपूर्ण शहरात चर्चा झाली. अनोख्या निषेधावर लोकांना हसू आवरत नव्हते. ती महिला म्हणाली, 'तो मला दरवेळी कमी पुऱ्या देतो. तो नेहमीच दादागिरी करतो. खरेतर तो वीस रुपयांना सहा पुऱ्या देतो; पण मला मात्र दरवेळी कमी पुऱ्या देतो. तो नेहमी माझ्याशी भांडत असतो. त्याची गाडी आता बंदच केली पाहिजे. आता त्याची गाडी इथे नकोच' असे म्हणत महिलेने हेका कायम ठेवला.

# कॅलिडोस्कोप

# मंदिरात नाही मूर्ती




भारतात एक असं मंदिर आहे, जिथे देवीची मूर्ती नसून केवळ तिच्या ओठांची पूजा केली जाते. हे ऐकून अनेकांना आश्चर्य वाटेल; परंतु ही वस्तुस्थिती असून इथे दरवर्षी हजारो भक्त दर्शनासाठी येतात. भारतातील मंदिरे आपापल्या परंपरा, श्रद्धा आणि अनोख्या रितीरिवाजांमुळे प्रसिद्ध आहेत. बहुतांश ठिकाणी देवतेची मूर्ती स्थापित केलेली असते आणि भक्त तिची पूजा-अर्चा करतात. हे मंदिर असेच असून एका डोंगराच्या कड्यावर वसलेले आहे. मंदिरापर्यंत पोहोचण्यासाठी सहाशे पायऱ्या चढाव्या लागतात. मंदिर गुहेसारख्या संरचनेत बांधले गेले आहे आणि भक्तांना आत जाऊन देवीचे दर्शन घ्यावे लागते. पौराणिक कथेनुसार, सतीचा देह हातात घेऊन भगवान शंकराने तांडव सुरू केलं. त्या वेळी भगवान विष्णूंनी सुदर्शन चक्राने सतीचं शरीर ५१ तुकड्यांत विभागलं. हे अवयव वेगवेगळ्या ठिकाणी पडले आणि त्या प्रत्येक ठिकाणी शक्तिपीठांची स्थापना झाली. असं मानलं जातं, की या शक्तिपीठामध्ये देवी सतीचे ओठ पडले होते. त्यामुळे इथे मूर्ती नसून फक्त ओठांचे प्रतीक मानून देवीची पूजा केली जाते. हे मंदिर राजस्थानमधील माउंट आबू येथे असलेलं अधर देवी मंदिर हे आहे. त ` एक अद्वितीय शक्तिपीठ मानले जाते. भक्त येथे माता दुर्गेच्या ओठांचे दर्शन घेतात आणि तिला लाल चुनरी, सिंदूर तसेच सौंदर्यवर्धक वस्तू अर्पण करतात. ओठ हे सौंदर्याचे आणि कोमलतेचे प्रतीक मानले जाते. विशेषतः नवरात्रीत येथे भक्तांची प्रचंड गर्दी होते. लोकांचा विश्वास आहे की या मंदिरात दर्शन घेणाऱ्याला वाणीची शक्ती प्राप्त होते. भक्त मनोभावे मागतात, ते देवीच्या कृपेने पूर्ण होतं. विशेष म्हणजे इथे दरवर्षी अनेक कलाकार, गायक आणि वक्ते येऊन आशीर्वाद घेतात. हे मंदिर केवळ धार्मिक स्थळ नसून श्रद्धेचं आणि परंपरेचं अद्वितीय उदाहरण आहे. माता दुर्गेचे ओठ इथे शक्तिस्वरूप मानले जातात आणि भक्त मनोभावे पूजा करतात. त्यामुळे हे मंदिर शक्तिपीठांच्या यादीतील सर्वांत खास आणि रहस्यमय स्थळांपैकी एक मानलं जातं.

# दोन जिव्हा असणारा प्राणी !

तुम्ही सिंह, अस्वल, मांजर, बिबट्या, हरीण आणि माकडे अशा अनेक प्राण्यांबद्दल ऐकले असेल; परंतु दोन जीभ असणाऱ्या लेमरबद्दल ऐकलं नसेल. हा प्राणी सहसा गटात राहतो, दिसायला माकडासारखा दिसतो; पण तो माकड नाही. मोठ्या, तेजस्वी डोळ्यांसह लांब शेपटी, ओले नाक आणि सपाट नखे असणारा हा प्राणी मादागास्कर बेटावर आढळतो.



लेमरच्या अनेक प्रजाती असल्या तरी ते भारतातील प्राणीसंग्रहालयातच दिसू शकतात. हा दोन जीभ असणारा एकमेव प्राणी आहे. असे मानले जाते की लेमरची एक जीभ दाखवण्यासाठी असते आणि दुसरी खाण्यासाठी. लेमर एक जीभ खाण्यासाठी आणि पिण्यासाठी वापरतात, तर दुसरी त्वचेची काळजी घेण्यासाठी वापरली जाते.

लेमरची दुय्यम जीभ कंगव्यासारखी असते. ते त्यांच्या शरीरातील अशुद्धता काढून टाकण्यासाठी तिचा वापर करतात. दुय्यम जीभ प्राथमिक जिभेच्या अगदी खाली असते. या प्राण्यांना गटात राहणे आवडते. ते झाडांमध्ये राहतात. फळे, पाने आणि कीटक खातात. ते पृथ्वीवरील सर्वात जास्त काळ जगणारे प्राइमेट आहेत. मानवांप्रमाणेच प्राइमेट्सना हात, बोटे आणि अंगठे असतात. ते बुद्धिमान असतात. काही लेमरचे पाय अत्यंत शक्तिशाली असतात. त्यामुळे ते झाडांवरून उडी मारण्यात पारंगत असतात. सर्वात मोठ्या लेमरचा आवाज मोठा, तीक्ष्ण असतो जो खूप दूरवरून ऐकू येतो. 'आय-आय' प्रजातीतील लेमरची बोटे आणि डोळे मोठे असतात. त्यामुळे ते रात्रीदेखील अन्न शोधू शकतात.

# सगळे खंड एक झाले तर...

या पृथ्वीवर सात खंड आणि पाच महासागर आहेत. आपला भारत आशिया खंडात आहे. यासोबतच युरोप, उत्तर आणि दक्षिण अमेरिका, ऑस्ट्रेलिया, आफ्रिका अंटार्क्टिका हे खंडही आहेत. आशिया खंडातून युरोपमध्ये जायचं असेल तर विमानप्रवास करावा लागतो. हे सगळे खंड एकमेकांपासून बरेच लांब आहेत.

अंटार्क्टिकावर जाण्याचा तर आपण विचारही करू शकत नाही. पण भविष्यात हे सगळे खंड एकमेकांशी जोडले जाणार आहेत. म्हणजेच या पृथ्वीतलावर एकच खंड असेल. या घटनेला 'पँजिया प्रॉक्सिमा' असं नाव देण्यात आलं आहे. सगळे खंड एकमेकांशी जोडले गेले तर ऑस्ट्रेलियातून अमेरिकेतल्या अलास्का प्रांतात अगदी सहज जाता येईल. इतकंच नाही, तर युरोपमधल्या स्कँडेनेव्हियामधून दक्षिण अमेरिकेतल्या पॅटागोनियापर्यंत तुम्ही चालत जाऊ शकाल.




अर्थात हे सगळं व्हायला अजून बरीच वर्षं आहेत. तब्बल २५ कोटी वर्षांनंतर सगळे खंड एकमेकांशी जोडले जातील. आजपासून साधारण पाच कोटी वर्षांनंतर ऑस्ट्रेलिया दक्षिण-पूर्व आशियाच्या जवळ येईल. याच पद्धतीने आफ्रिका खंड युरोपच्या जवळ जाईल. या काळात अटलांटिक महासागराचा आवाकाही बराच वाढलेला असेल, असं ख्रिस्तोफर स्कॉटीज या शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. पृथ्वीच्या पोटात खडकांची हालचाल सुरू असते. पृथ्वीच्या पोटातल्या मोठाल्या दगडांच्या हालचालींमुळेच सर्व खंड एक होणार आहेत. या दगडांच्या सरकण्याच्या गतीवरून साधारण २५ कोटी वर्षांनंतर सर्व खंड एक झालेले असतील, असा अंदाज शास्त्रज्ञांनी वर्तवला आहे. अर्थात २५ कोटी वर्षांनंतर ही पृथ्वी कशी असेल याचा आपण फक्त अंदाजच बांधू शकतो!

# क्यूआर कोडवर भीक, दररोज दोन हजारांची कमाई



रस्त्यावर, मंदिरात किंवा रेल्वे स्टेशनवर अनेक भिकारी तुम्ही पाहिले असतील. त्यांच्या अंगावर फाटलेले कपडे असतात, हातात रिकामी वाटी घेऊन ते पैसे मागताना दिसतात. केविलवाणी अवस्था पाहून अनेकांना दया येते; पण तुम्ही कधी ऑनलाइन भीक मागणारा भिकारी पाहिला आहे का? होय, असा एक भिकारी आहे जो यूट्यूबवर लाइव्ह येऊन भीक मागतो. या ऑनलाइन भिकाऱ्याचे नाव आहे गौतम सूर्य. आतापर्यंत गौतमने त्याच्या चॅनेलवर तीन हजार आठशे व्हिडीओ अपलोड केले आहेत. त्याच्या या व्हिडीओला एकूण २६ कोटींहून अधिक व्ह्यूज मिळाले आहेत. गौतम सूर्य दररोज तीन-चार तास लाइव्ह येतो आणि स्क्रीनवर दोन-तीन कोड लावून लोकांकडून पैसे मागतो. त्याच्या चॅनेलच्या बायोमध्ये लिहिले आहे, की एक दिवस मी माझे घर नक्की बांधेन, मग कोणीही मला इथून निघ जा असे म्हणणार नाही. विशेष बाब म्हणजे तो कोणालाही फॉलो करत नाही, फक्त त्याच्या दुसऱ्या चॅनेललाच फॉलो करतो. आतापर्यंत त्याचे व्हिडीओ २६ कोटींहून अधिक वेळा पाहिले गेले आहेत. तो लाइव्ह येतो तेव्हा एका वेळी दहा हजारांहून अधिक लोक त्याच्याशी जोडले जातात. लाइव्ह पाहताना लोक त्याला क्यूआर कोडद्वारे एक रुपयापासून शंभर रुपयांपर्यंत पेमेंट करतात. बहुतांश लोक त्याला एक रुपया पाठवतात. कोणी पेमेंट करतो, तेव्हा तो त्या व्यक्तीचे नाव घेऊन 'थँक्यू' म्हणतो आणि कोणत्या नंबरवरून किंवा नावाने पैसे आले ते सांगतो. गौतम दररोज किमान हजार रुपये कमावतो.

# पाण्याच्या एका थेंबातून वीजनिर्मिती




जगात सतत नवनवे शोध लागत असतात. वाढत्या लोकसंख्येला वीज, पाणी, इंधन यांची कमतरता भासणार आहे. वीज कमी पडत असल्यामुळे भारनियमनाची वेळ येते. विजेची ही वाढती गरज भागवण्यासाठी पवन ऊर्जा, सौर ऊर्जा अशा अक्षय्य ऊर्जेचा वापर होतो. हाँगकाँग विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांनी असाच एक अनोखा शोध लावला आहे. त्यांनी एक जनरेटर तयार केला आहे. हा जनरेटर पावसाच्या पाण्याच्या फक्त एका थेंबाने १०० एलईडी बल्ब प्रकाशित करू शकतो. पाण्याचा एक थेंब १०० एलईडी बल्ब कशा प्रकारे प्रकाशित करू शकतो, असा प्रश्न उपस्थित होऊ शकतो. हे ऐकून कोणाच्याही भुवया उंचावतील. पण हे खरं आहे. या शोधाबद्दल शास्त्रज्ञांचं कौतुक करावं तेवढं कमी आहे. 'नेचर' या जगप्रसिध्द जर्नलमध्ये हा शोध प्रकाशित झाला आहे. या जनरेटरच्या माध्यमातून १५ सेंटीमीटर उंचीवरून पाण्याच्या १०० मायक्रोलीटरच्या थेंबाद्वारे १४० वॉल्ट ऊर्जेची निर्मिती होऊ शकते. हाँगकाँग विद्यापीठातले शास्त्रज्ञ अनेक वर्षांपासून या मुद्द्यावर काम करत होते. आता त्यांच्या प्रयत्नांना यश आलं आहे. या जनरेटरची क्षमता प्रचंड असल्याचं बोललं जात आहे. हा जनरेटर आपल्या क्षमतेपक्षा अधिक ऊर्जेची निर्मिती करू शकतो. त्यामुळे विजेची कमतरता दूर होऊ शकते. संपूर्ण जगाला या संशोधनाचा लाभ होऊ शकतो. भारतासारख्या प्रचंड लोकसंख्येच्या देशात हा शोध खूपच लाभदायी ठरू शकतो.

# गावाबाहेरचं शहर

भारतातल्या एखाद्या शहरात जाण्यासाठी आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडावी लागली तर... आपल्याच देशातलं एखादं शहर दुसऱ्याच देशात असेल तर... असं कसं होऊ शकतं, हा प्रश्न उपस्थित होणं अगदी स्वाभाविक आहे. पण अमेरिकेच्या एका शहरात जाण्यासाठी लोकांना कॅनडामधून जावं लागतं. आहे ना गंमत! पॉईंट्स रॉबर्ट्स असं या शहराचं नाव आहे. या शहराचं नाव बऱ्याचजणांची ऐकलंही नसेल. हे शहर अमेरिकेचा भाग असलं तरी ते अमेरिकेत नाही. हे शहर अमेरिकेपासून खूप लांब आहे. इथे जाण्यासाठी अमेरिकन लोकांनाच आंतरराष्ट्रीय सीमा पार करावी लागते. पॉईंट्स रॉबर्टसला अमेरिकेचं पेन-एक्सक्लेव्ह असं म्हटलं जातं. खाजगी विमान किंवा बोटीतून येणारी लोकं सोडल्यास अमेरिकन लोकांनाही कॅनडामार्गे या शहरात यावं लागतं. पॉईंट्स रॉबर्टस हा भाग एखाद्या गावासारखाच आहे. २०१० च्या जनगणनेनुसार इथे १३०० लोक राहतात. अमेरिकेने या शहरात काही साक्षीदारांना वसवल्याचं म्हटलं जातं. बरेच लोक नव्या ओळखीनिशी इथे वावरतात. पॉईंट्स रॉबर्टसला विमान किंवा बोटीनेही जाता येतं. अमेरिकन लोक गाडीनेही या शहरात जाऊ शकतात. मात्र गाडीने जाणाऱ्यांना दोन वेळा आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडावी लागते. गाडीने जाणाऱ्यांना आधी कॅनडात जावं लागतं. मग कॅनडातून पॉईंट्स रॉबर्टसला जाताना पुन्हा सीमा ओलांडावी लागते. इथल्या लोकांसाठी बरेच नियम बनवण्यात आले आहेत. इथल्या रहिवाश्यांना अख्खा टोमॅटो नेता येत नाही. पण ते चिरलेला टोमॅटो नेऊ शकतात. अमेरिकेतल्या शेतांमध्ये कीड, रोगराई पसरू नये, यासाठी हा नियम करण्यात आल्याचं बोललं जातं.




# महती गुरूची



गुरू हा आपल्या सौरमालेतला सर्वात मोठा ग्रह आहे. गुरूचा संबंध बऱ्याच धार्मिक घटनांशी जोडला जातो. ज्युपिटर ही रोमन देवता. या देवतेच्या नावावरूनच गुरूला ज्युपिटर हे नाव देण्यात आलं आहे. गुरू ग्रहाच्या वातावरणातले ढग केशरी आणि भुऱ्या रंगाचे असतात. हे ढग अमोनियाचे स्फटिक आणि अमोनियम हायड्रो सल्फाइटपासून बनलेले असल्यामुळे त्यांचा रंग वेगळा दिसतो. गुरू ग्रहावर प्रचंड गुरूत्वाकर्षण आहे. याच कारणामुळे ब्रह्मांडातल्या बऱ्याच उल्का पृथ्वी किंवा इतर ग्रहांऐवजी गुरू ग्रहाकडे ओढल्या जातात. या ग्रहावरचा एक दिवस फक्त नऊ तास आणि ५५ मिनिटांचा असतो. गुरूला सूर्याभोवती प्रदक्षिणा घालायला ३३३ दिवस लागतात. गुरूचं एक वर्षं म्हणजे पृथ्वीवरची ११.९ वर्षं. गेल्या ३५५ वर्षांपासून या ग्रहावर एक भयंकर वादळ घोंघावत आहे. या वादळाचा जोर अद्यापही कमी झालेला नाही. खगोलशास्त्रज्ञ या वादळावर बरंच संशोधन करत आहेत. हे वादळ लांबून एखाद्या लाल ठिपक्यासारखं दिसतं. त्यामुळे त्याला 'द ग्रेट रेड स्पॉट' असं म्हटलं जातं. १६६५ मध्ये गुरूवरचं हे वादळ पहिल्यांदा दिसलं होतं. १८३० मध्येही हे वादळ टिकून होतं. मात्र या वादळामागचं रहस्य अद्यापही उलगडलेलं नाही. गुरूचे एक, दोन नाही तर तब्बल ७९ चंद्र म्हणजे उपग्रह आहेत. गुरू सूर्यापासून बराच लांब असल्यामुळे इथलं वातावरण थंड असतं. गुरू ग्रहावरचं सरासरी तापमान उणे १४८ अंश इतकं असतं. तर अशा या गुरू ग्रहाबद्दल खगोल शास्त्रज्ञांना खूप कुतुहल वाटतं.

# 'पूर' किंवा 'बाद' मागील कारण काय?




बरेचदा शहरांच्या नावांच्या शेवटी 'पूर' किंवा 'बाद' असे लिहिलेले आढळते. नागपूर, सोलापूर, कानपूर, बदलापूर या भारतातील प्रमुख शहरांच्या नावातही 'पूर' या शब्दाचा उल्लेख आढळतो. हैदराबाद, गाझियाबाद, अहमदाबाद ही काही भारतातील प्रमुख शहरे आहेत, ज्यांच्या नावाच्या शेवटी 'बाद' आहे. मात्र शहराच्या नावाच्या शेवटी 'पूर' किंवा 'बाद' का लिहितात? असा प्रश्न अनेकांना पडला असेल. भारतात अशी अनेक शहरे आणि गावे आहेत, ज्यांच्या नावाच्या शेवटी पूर असे लिहिलेले असते. पूर हा शब्द संस्कृत भाषेतून आलेला आहे. या शब्दाचा अर्थ शहर किंवा किल्ला. हा शब्द प्राचीन काळापासून वापरला जात आहे. हस्तिनापूरसारख्या प्राचीन शहरांच्या नावाचा उल्लेख आहेच. जुन्या काळातील अनेक राजे शहरांची नावे देताना पूर हा शब्द जोडत असत. भावी पिढ्यांना त्यांच्या राजांची नावे लक्षात राहावीत, यासाठी राजाच्या नावासमोर पूर असे जोडले जात असे. याच कारणामुळे राजा जयसिंग यांनी आपल्या शहराचे नाव जयपूर असे ठेवले असल्याचे बोलले जाते. भारतात गाझियाबाद, अहमदाबाद, फिरोजाबाद, पाकिस्तानात इस्लामाबाद अशा नावांची शहरे आहेत. महत्त्वाची बाब म्हणजे बाद हा शब्द 'आबाद' या शब्दाचा अपभ्रंश आहे. 'आबाद' हा पर्शियन शब्द आहे, त्यात 'आब' म्हणजे पाणी. हा शब्द जमीन किंवा ठिकाण दर्शवतो. याच कारणामुळे अनेक शहरांच्या नावाच्या शेवटी बाद असे लिहिलेले आहे. बऱ्याच वेळा अनेक राजे आपल्या नावाच्या शेवटी बाद असे जोडून ते नाव शहराला द्यायचे. फिरोजाबादचे नाव फिरोजशाहच्या नावावरून ठेवण्यात आले. १४११ मध्ये सुलतान अहमद शाहने आपल्या नावावरून शहराचे नाव 'अहमदाबाद' असे ठेवले होते.

